Historicity Research Journal
Volume 1 | Issue 5 | Jan 2015 ISSN:- 2393-8900

Research Article

विकासाच्या वाटेवर मोहोळ

भारत एम. जाधव

इतिहास विभाग प्रमुख, देशभक्त संभाजीराव गरड महा. मोहोळ. ता. मोहोळ, जि. सोलापूर.

सारांश :

पश्चिम महाराष्ट्रातील एकूण सोलापूर जिल्हा महत्वाचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. सोलापूर येथील 'चादर' आणि 'टर्किसटॉवेल' जगप्रसिध्द आहे. पश्चिम महाराष्ट्रातील एकूण ३१ तालुके सतत दुष्काळी म्हणून ओळखले जातात. यास पारसदानी समितीने सन १९६०, दुसऱ्या केंद्रीय जलसिंचन आयोगाने सन १९६२, सुकधनकर समितीने सन १९७३ आणि त्यानंतर सुब्रम्हन्यम समितीने सोलापूर जिल्ह्यातील ११ तालुके अवर्षण प्रवण म्हणून केंद्र सरकारने मान्यता दिलेली होती.[१]

प्रस्तावना :

यामध्ये मोहोळ तालुक्याचा समावेश होतो. ह्या तालुक्यात जमीन बहुतांश मुरमाड स्वरुपाची आहे. भीमा, सीना, भोगावती, नाझरी अशा लहान-मोठ्या नद्या मोहोळ तालुक्यातून वाहतात. परंतु भीमा नदीचा अपवाद सोडला तर पावसाळ्यानंतर इतर नद्या सतत कोरड्या राहिलेल्या आहेत. भीमा नदी पुणे जिल्ह्यात भीमाशंकर डोंगरात उगम पावून ती उत्तरेकडून दक्षिणेकडे १०० मैल प्रवास करुन मोहोळ मधून पुढे कर्नाटकात वहात जाऊन कृष्णेस मिळते. तर सीना नदी ही अहमदनगर जिल्ह्यात उगम पावून मोहोळ तालुक्यातून कर्नाटकात भीमेस मिळते. नदीकाठच्या कांही सकल भाग सोडला तर मोहोळ तालुक्यातील जवळ-जवळ ८० टक्के जमीन ही जिरायती होती. शेतीला व पिण्यासाठी विहीर व कुपनलिका यावर अवलंबून रहावे लागते. अगदी पिकांचे उत्पादन फार कमी प्रमाणात येत असे. मात्र सन १९८०-८१ नंतरच्या काळात ऊसाचे क्षेत्र वाढल्याने तालुक्याच्या आर्थिक विकासात महत्त्वाची भर पडल्याचे दिसून येते.[२]

मोहोळ तालुक्याची भौगोलिक पाश्वभूमी :

मोहोळ तालुक्याचे एकूण क्षेत्रफळ १,३३,००० हेक्टर असून खरीप पीकासाठी ७६४५ हेक्टर आणि पीकासाठी ७९३८० हेक्टर आहे. आणि फळबाग पीकाचे क्षेत्र ७६०० हेक्टर आहे.[३] हवामान उष्ण व कोरडे आहे. वार्षिक पर्जन्यमान ६५३.९ मी.मी. आहे. मोहोळ तालुक्यातील जमिनीचा सामू ७.५ ते ८.५ इतका आहे. ब्रिटिशकालीन आष्टी तलाव याच तालुक्यात असून या तलावाचे काम जुलै १८८१ मध्ये पूर्ण झाले. मोहोळ तालुक्याची लोकसंख्या २७७५२६ एवढी आहे.

मोहोळ तालुक्याची ऐतिहासिक पाश्वभूमी :

मोहोळ या गावाला ऐतिहासिक वारसा फार मोठा लाभला आहे. पांडव वनवासात व अज्ञात वासात फिरत असताना मोहोळ पासून दक्षिण पूर्वेस १५ कि.मी. अंतरावरती पांडव पोफळी येथे मुक्काम पडल्याची आख्याईका सांगणारे गाव अस्तिवात असल्याने दिसून येते. आज धर्मराजाचे मंदिर ही तेथे पहावयास मिळते. 'चंद्रमौलेश्वर' वरुन 'चंद्रमौळी' आणि पुढे मोहोळ असे मोहोळला नाव मिळाले

आहे. मोहोळ व वडवळ येथील प्रसिध्द नागनाथ मंदिर, यादव कालीन भानेश्वर, निलकंठेश्वर ही हेमाडपंथी शैलीची मंदिरे पहावयास मिळतात. कोरवली, परेमेश्वर पिंपरी व नरखेड येथील सिध्देश्वर मंदिर अंकोली येथील भैरवनाथ मंदिर, पापरी येथील महादेवाचे मंदिर.

प्राचीन, मध्ययुगीन, आधुनिक कालखंडात अनेक राजकीय स्थित्यतंरे झाली. त्यांच्या राजवटी मोहोळ तालुक्याने पाहिलेल्या आहेत. मोहोळ परीसर इ.स. ९० ते इ.स. ३०० पर्यंत सातकर्णी राजवटीखाली होता. सात वाहनाच्या काळात त्यावर मोठ्या प्रमाणात चालत होता.[४] पुढच्या काळात कल्याणीचे चालुक्य, बदमीचे चालुक्य, यांनीही राज्ये केली. इ.स. १३४७ मध्ये बहामणी सत्तेची स्थापना झाली. बहामनी राजवटभ्च्या आठ राजकीय विभागातील सोलापूर विभागात मोहोळचा समावेश होता.[५] बहामनी सत्तेची इ.स. १५२६ मध्ये शकले पडल्यानंतर निर्माण झालेल्या विजापूरच्या अदिलशाहीने सोलापूर परगण्यावरती आपले अधिराज्य निर्माण केल्यानंतर मोहोळवरती देखील ह्या सत्तेचा अमल कांही काल होता. याही काळात मोहोळचा आर्थिक विकास होत राहीला. मिर्झा जयसिंह दक्षिणेच्या स्वारीवर असताना १२ जाने. १६६६ मध्ये त्यास जाणारा जनराना देगांव येथे लुटल्याचे उल्लेख सापडतात. पुढे मोघली सत्तेचा अमल दक्षिणेत सुरु झाला. मोघल बादशाह औरंगजेब इ.स. १६९५ ते इ.स. १६९९ पर्यंत मोहोळ तालुक्यातील बेगमपूर येथे मुक्कामास होता. येथून मोघली सम्राज्याचा कारभार त्या काळात चालत होता. पुढे राजे भास्कर यांची दोन मुले किसनराव व शंकरराव औरंगजेबच्या नोकरीत दाखल झाली होती. राजे भास्कर याची समाधी मोहोळच्या पश्चिमेला आहे. या समाधी इमारतीवर हिंदु शिल्प कोरल्याचे दिसून येते.

कोल्हापूर संस्थानचे छत्रपती शहाजीमहाराज उर्फ बुवासाहेब (इ.स. १८२२-१८३८) यांनी इंग्रजांच्या त्रासाला कंटाळून तुळजाभवानीच्या दर्शनासाठी जात असताना येवती गावात त्यांचा मृत्यू झाला. त्यांची समाधी आजही इतिहासाची साक्ष देत आहे. समाधीच्या देखभालीसाठी व दिवा बत्तीसाठी येवती येथील गोडसे पाटील घराण्याकडे व्यसस्था होती. अनंत गणपत गोडसे हे मागील कांही वर्षापर्यंत या समाधीची देखभाल करीत होते. त्यांना त्यासाठी कोल्हापूर संस्थाकडून 'वर्षासन' मिळत होते. परंतु आता ते बंद झाल्याने गावकरी व्यवस्था करीत आहेत.[६] बुवासाहेब महाराजांनी पापरी येथील जागृत देवस्थान महादेव मंदिराचा जिर्नोध्दार केल्याचे उल्लेख सापडतात.[७]

पेशवाईचा अस्त मोहोळ तालुक्यातील आष्टी येथे इ.स. २० फेब्रुवारी १८१८ साली झालेल्या लढाईत झाला. -नरवीर बापू गोखले व इंग्रज यांच्यात झालेल्या या लढाईत पेशव्यांचा शेवटचा सेनापती नरवीर बापूजी गोखले मारले गेले. याच ठिकाणी -नरवीर बापू गोखले यांची समाधी आहे.

मोहोळ हे शहर सोलापूर जिल्ह्याच्या मध्यवर्ती ठिकाणी राष्ट्रीय महामार्गावर असून सन १९५० च्या राज्य पूर्नरचनेत हैद्राबाद संस्थानातील ६४ गावे, मिरज संस्थानातील ६ गावे व माढा तालुक्यातील २० गावे मिळून अशा ९० गावांचा हा तालुका निर्माण झाला आज या तालुक्यात १०४ गावे असून त्यापैकी खरकटणे, घोरपडी, पवारवाडी ही ३ गावे काल प्रवाहामध्ये -नामशेष झाली ओहेत.

मोहोळ तालुक्याला फार मोठा साहित्यिक वारसा लाभला आहे. शाहीरी परंपरा आणि भेदीक काव्य परंपरा १२ व्या शतकात मोहोळ मध्ये उदयास आली. वारकरी सांप्रदायाचा १२ व्या शतकात संत ज्ञानेश्वरांनी पाया रचला. दरम्यानच्या काळात मोहोळ मध्ये नागनाथ सांप्रदायाचा पाया रचला गेला. मोहोळ आणि वडवळ या गावांना 'संताची भूमी' असे म्हणतात. मोहोळ शहरात देवगीरी यादव कालीन 'भानेश्वर' व 'निलकंठेश्वर' ही हेमाडपंथी शैलीची दोन मंदिरे आहेत. नागनाथ भक्त अज्ञानसिध्द यांनी लिहिलेला 'संकट हरणी' हा ग्रंथ सन १३९१ साली लिहला असून तो मोहोळ मधील पहिली साहित्यिक सपंदा मानली जाते. १७ व्या शतकात करमाळ्याचे रावरंभा निंबाळकर यांच्या जहागिरीमध्ये मोहोळ होते. साताराच्या छत्रपती घराण्याकडून देशमुखांना जहागिरी मिळाली असल्याने देशमुखांना जूना सरकार वाडा आणि देशमुखांची गढी आजही पहावयास मिळते. भीमा नदीच्या काठावर औरंगजेब बादशहाचा मुक्काम असतांना त्यांच्या सैनिकांचे घोडे पाणी पिण्यास येत व घोडे बांधले जात असत. त्या ठिकाणीच 'घोडेश्वर' हे गाव वसले. या ठिकाणीच औरंगजेब बादशहाचा सेनापती गाजीउद्दीन फिरोजजंगची सावत्र आई निजामंडल मुहक हीची कबर आहे.

सामाजिक क्रांतीचे प्रणेते महात्मा जोतिराव फुले यांनी लिहिलेला प्रसिध्द असा 'शेतकऱ्यांचा आसूड' या ग्रंथातील ४ थ्या प्रकरणाचे जाहीर वाचन स्वतः महात्मा फुले यांनी मोहोळ तालुक्यातील मौजे कुरूल या गावी सन १८८४ साली केले होते.[८] मोहोळ परिसरात साहित्यिक म्हणून प्रसिध्द असलेले डॉ. श्री निवास जोशी लिखीत 'सुधारण्यापलीकडे', प्रा. वसंत वाघमारे यांच्या प्रातिनिधीक 'कवीता' हा काव्यसंग्रह, भाई विश्वासराव फाटे यांचा 'भटकंती' व 'एका विश्वासाची कथा' ही पुस्तके प्रसिध्द आहेत. तर बालमोहन आदलिंगे यांनी लिहिलेला 'अस्वस्थ' कथासंग्रह व त्यांनी प्रसिध्द केलेला 'प्रियदर्शिनी' हा प्रातिनिधीक काव्यसंग्रह मोहोळला वारसा साहित्यिक वारसा मिळवून देणारा आहे.

दुसऱ्या महायुध्दाच्या काळात अन्नधान्य टंचाई फार मोठ्या प्रमाणात होती. हैद्राबाद निजामाच्या अधिपत्याखालील गावात अन्नधान्य बाजार बंदी होती. या काळात बाबुराव पाटील अनगरकर यांनी इंग्रजांच्या आदेशाला न जुमानता स्वतःच्या मळ्यात 'धान्य बाजार' भरवून गोर गरीबांना धान्य पुरविले होते. म्हणूनच त्यांना 'धान्य पुरविणारा पाटील' म्हणून ओळखले जात असे.[९] स-१८८५ मध्ये

महात्मा फुले यांच्या प्रेरणेने मोहोळ येथे शेतकऱ्यांनी मिळून आप्पाराव पुराणिक यांच्या मार्गदर्शनाखाली खाजगी शाळा सुरु केली होती. आज या शाळेबद्दल 'गावठी शाळा' एवढाच उल्लेख मिळतो. पुढे सन १९५० मध्ये एन. कुलकर्णी यांनी मोहोळ येथे माध्यमि□ शाळा सुरु केली. आज मोहोळ तालुक्यात उच्च शिक्षण व पदव्यत्तर शिक्षणाची सोय मोठ्या प्रमाणात झाल्याची दिसून येते.

सन १९७४-७५ मध्ये दुष्काळ पडला त्यावेळी नागरीकांना खाण्यासाठी धान्य नव्हते म्हणून शेतकरी कामगार पक्षातर्फे वैराग येथे मोर्चा काढून गोदाम फोडण्याचा प्रयत्न केला. या मोर्चावर पोलीसांनी गोळीबार केला. त्यामध्ये आठ व्यक्ती ठार झाले तर पंढरपूरचे सर्जेराव थोरात यांच्या मांडीतून गोळी आरपार जाऊन ते जखमी झाले. त्यामध्ये बाबुराव पाटील, चंद्रकांतनाना निबांळकर, भाई एस.एम. पाटील, भाई विश्वासराव फाटे यांनी भाग घेतला होता. यातूनच पुढे महाराष्ट्र शासनाने रोजगार हमी योजना सुरु केली. या रोजगार हमीचे जनक वि.स. पागे होते.[१०]

इ.स. १९८० मध्ये उजनी धरणाचे बांधकाम पूर्ण झाले आणि सन १९८१ मध्ये डाव्या व उजव्या कालव्यातून शेतीसाठी पाणी पुरवठा करण्यास सुरुवात झाली. यातून मोहोळ तालुक्याच्या दक्षिण भागास पुरवठा झाल्याने अर्ध्या मोहोळ तालुक्याचे भाग्य उजळले. आष्टीच्या ब्रिटिशकालीन तलावातून उपसा जलसिंचन योजना कार्यान्वीत झाल्या. पूढच्या काळात बबनराव शिंदे यांच्या प्रयत्नातून भीमा-सीना जोडकालवा कार्यान्वीत झाला. सीना नदीला कालव्याचा दर्जा दिला. मोहोळ तालुक्यात सीना नदीवर ८ कोल्हापूर पध्दतीचे बंधारे बांधले. आणि तालुक्यातील शेतीला पाणी पुरवठा होऊ लागला.[११]

मोहोळ तालुक्यात एकूण क्षेत्र १,३३,००० हेक्टर पैकी शेतकऱ्यांच्या प्रयत्नातून विहीरीच्या माध्यमातून २०६८० हेक्टर, कुपनलिकेच्या माध्यमातून १०,७४० हेक्टर, उजनी धरणाच्या माध्यमातून २४१० हेक्टर, आष्टी तलावाच्या माध्यमातून ३८४ हेक्टर, सीना नदीतून २२०८ हेक्टर, इतर स्त्रोतातून ५,४५० हेक्टर असे एकूण ४१८७२ हेक्टर क्षेत्र आलिताखाली आले. तरी सुध्दा उर्वरीत भागात पाण्याचा दुष्काळ आहे.[१२]

पाणी पुरवठ्याच्या साधनामुळे पीक पध्दतीमध्ये आमूलाग्र बदल झाले. फळपिके, भाजीपाला, तृणधान्य, कडधान्य, कारण म्हणजे नवीन तंत्रज्ञानाचा वापर, ठिबक सिंचन सयंत्राचा वापर, फळ बागासाठी रोपे, प्राथमिक खर्चासाठी १०० अनुदान दिले जात असल्याने वाढ होत असल्याचे दिसून येते. अलीकडील काळात मोहोळ तालुक्यात ऊस पीक मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावत असल्याचे दिसून येते. याचे मुख्य कारण महात्मा फुले कृषी विद्यापीठापर्यंत कृषी संशोधन केंद्र मोहोळ यांच्या मार्फत योग्य मार्गदर्शन केले जाते.[१३] त्यामुळे शेतीमधून येणाऱ्या उत्पादनात वाढ झाल्याचे दिसून येते.

मोहोळ तालुक्याच्या विकासाच्या वाटचालीमध्ये कृषी भूषण विश्वासराव कचरे , तेलंगवाडी, कृषी भूषण दादा बोडके, अनगरकर, कृषी भूषण रामचंद्र जगताप सोहाळे, पांडूरंग सावंत यांच्या ज्ञानाचा उपयोग परिसरातील शेतकऱ्यांनी करुन घेतल्याचे आढळून येते. मोहोळ तालुक्यात ऊसाचे क्षेत्र वाढू लागल्याने साखर कारखान्याची गरज निर्माण झाली. यातून कोल्हापूरहुन आलेले भिमराव महाडीक यांनी टाकळी सिकंदर येथे भीमा सह□ारी सा□र □ार□ाना सुरु झाला. त्याच बरोबर लोकमंगल साखर कारखाना सुरु झाला. यातून मोहोळ तालुक्यातील शेतकऱ्यांचे जीवन पूर्णपणे बदलले आहेत.[१४]

शेतीला पुरक दुग्धव्यवसाय फार मोठ्या प्रमाणात चालतो. मोहोळ तालुक्यातून दररोज ५०,००० लिटर पेक्षा जास्त दूध संकलित होते. त्यापैकी १८००० हजार लिटर दूध सोलापूर जिल्हा दूध संघ, वारणा किंवा खवा तयार करण्यासाठी जाते. १८ व्या पशुगणनेनुसार संकरित जनावरे ३१५९६, देशी जनावरे ३२७१५, म्हैसवर्ग ३६६१५, शेळ्या-मेंढ्या ८६९५०, कोंबड्या ८०७२८ इतर ११४३८ असे एकूण २८००४२ जनावरांची संख्या तालुक्यात आहे. गेल्या दहा वर्षाचा विचार केल्यास संकरित गाईची संख्या १७००० ने वाढली असून देशी गुरांची संख्या कमी होते आहे. म्हशींची संख्या देखील वाढत असून शेळ्या-मेंढ्याची संख्या कमी होते आहे. शेतीच्या मशागतीसाठी लागणाऱ्या बैलाची संख्याही □मी झाली आहे.[१५]

मोहोळ तालुक्यात शेती उत्पादन, दुग्धव्यवसायाच्या वृध्दीबरोबर औद्योगिकरण देखील झपाट्याने वाढले आहे. त्यामध्ये चंद्रमौळी औद्योगिक वसाहतीमध्ये छोटे-मोठे ६५ उद्योग व्यवसाय चालत असून कोठारी इंडस्ट्रिची उत्पादने परदेशात जात असून त्यामुळे तालुक्याला परकीय चलन मिळाल्याने परदेशी चलनाची गरज कांही प्रमाणात भागवली जात असल्याचे दिसून येते. त्याचबरोबर रेल्वे स्लिपर्स् तयार करणारी फॅक्टरी, वर्धमान फर्टीलायझर, अशा नामवंत उद्योगानी मोहोळ चे नाव देश-विदेशात पोहचवल्याचे दिसून यंते.[१६]

मोहोळ तालुक्याचा अतिशय वेगाने होत असलेल्या विकासाला दळवळण यंत्रने□ महत्वाचा हातभार लावला आहे. राष्ट्रीय महामार्ग, रेल्वे मार्ग, राज्य मार्ग, कच्चे रस्ते यामुळे खेड्या-पाड्यात उत्पादित झालेला माल देशाच्या महत्वाच्या बाजार पेठेपर्यंत सहजगतीने पाठवता येतो. त्यामुळे मालाची ने-आण सोपी झाल्याने शेतकऱ्यांना उत्पादन वाढीस चालना मिळत आहे. अशा प्रकारे सतत दुष्काळाचे सावट असणाऱ्या मोहोळ तालुक्यातील सर्व क्षेत्रातील घटकांनी महत्वाचे योगदान दिल्याने मोहोळ तालुक्याचा विकास झाल्या-ने दिसून येते.

निष्कर्ष :

मोहोळ परिसरात प्राचीन कालवधीपासून अनेक राजवटीनी सत्ता उपभोगल्याचे दिसून येते. अशा ही परिस्थितीमध्ये मोहोळचा विकास होत रहिल्याचे दिसून येते. सातवहाणाच्या कालावधीमध्ये कराड-सिध्दापूर-देव-तेर प्रतिष्ठान (पैठण)- पितळखोरे-अरब देशाच्या बरोबर चालणारा व्यापारी मार्ग होत असे दिसते. त्यामुळे त्याही काळात मोहोळला व्यापारी दर्जा होता. सतत दुष्काळाशी सामना करुन देखील या भागातील लोक स्वाभिमानाने जीवन जगल्याचे दिसून अढळून येते. कमी पावसावरती देखील छोटी उत्पादन घेण्याची धडपड दिसते. उजनी धरणातून पाणी शेतीला मिळू लागल्यामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांची पारंपारीक शेती पध्दती सोडून आधुनिक पध्दतीने शेती केल्याने शेती उत्पादनात महत्वाची वाढ झाली आहे. शेतीला जोडधंदा म्हणून पशुपालन, दुग्ध व्यवसायाला गती मिळाली. शासकीय योजनाचा जस्तीत जास्त फायदा घेतल्याचे आढळून येते. उद्योग धंद्याच्या वाढीमध्ये चंद्रमौळी औद्योगिक वसाहतीचे कार्य वाखण्याजोगे आहे. तालुक्याच्या विकासात बाबुराव पाटील अनगरकर, चंद्रकांत निंबाळकर, शहाजीराव पाटील, राजन पाटील, लक्ष्मणराव ढोबळे यांचे कार्य महत्वाचे आहे. कृषी संशोधन केंद्र, बिजगुणन कार्यालय यांचेही मार्गदर्शन महत्वाचे वाटते.

विकासाच्या वाटेमध्ये राज्य रस्ते, राष्ट्रीय महामार्ग, रेल्वे आणखीन विकासाला संधी आहे. यांचाही मोठा वाटा असल्याचे मला वाटते. म्हणूनच सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्याचा विकास महाराष्ट्राला विकास महाराष्ट्राला आदर्श ठरेल.

संदर्भ ग्रंथ सूची

1. *जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन सोलापूर जिल्हा, सन १९६०-३१. पृ. ६.*
2. *[illegible]रे विकास महामंडळ, उजनी वसाहत, कोळेगांव ता. मोहोळ यांचे कार्यालयातून. ३ जाने. २०१०.*
3. *[illegible]दम द.दा. मोहोळची वाटचाल. मे २०१०. पृ. ७६.*
4. *[illegible]ओटिअर ऑफ बॉंबे प्रेसिडेन्सी, डिस्ट्रीक सोलापूर. १८८४. पृ. ३,६.*
5. *महाराष्ट्राचे जिल्हे, सोलापूर, महाराष्ट्र सरकार प्रसिध्दी खात्याने प्रकाशन. पृ. १३.*
6. *मुलाखत, साहबराव शेळके, येवती ता. मोहोळ. दि. ७ फेब. २०१०.*
7. *देशमुख गोपाळराव, सोलापूर जिल्ह्याचा इतिहास, मराठा कालखंड, रेव प्रकाशन पंढरपूर. सन २००९. पृ. १२.*
8. *आदलिंगे बालमोहोन, 'अस्वस्थ' कथा संग्रहातून प्रियदर्शिनी दिनदर्शिका, फेब. २००१. पृ. ४.*
9. *[illegible]ताळ एस.के., 'लोकनेते बाबुराव आण्णा पाटील' जाने. २००१. पृ. १२.*
10. *डॉ. कौशीक गायकवाड, (संपा), सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्राचा वैभवशाली मोहोळ तालुका, स्मरणिका. मे. २०१०. पृ. ३६.*
11. *भीमा कालवा मंडळ, सोलापूर, तालुकानिहाय सध्य:स्थिती दर्शविणारी पुस्तिका. १ एप्रिल २००९. पृ. ६२,६५.*
12. *श्री. कोल्हाळ जगन्नाथ, शेतकऱ्यांच्या दारी गंगा लेखातून, महाराष्ट्राचा वैभवशाली, मोहोळ. मे. ३ जाने. २०१३.*
13. *मुलाखत, प्रा. कदम डी.डी., मुख्य अधिकारी, राहुरी कृषी विद्यापीठ अंतर्गत, कृषी संशोधन केंद्र, मोहोळ. ३ जाने. २०१३.*
14. *वार्षिक अहवाल, भिमा सहकारी साखर कारखाना, टाकळी. (सि.), सन १९९३-९४. पृ. ३.*
15. *मुलाखत, कदम शहाजीराव, तालुका कृषी अधिकारी, मोहोळ. दि. ३ जाने. २०१२.*
16. *[illegible]ठारी ॲग्रो इंडस्ट्रिज लि. मोहोळ यांचे कार्यालयीन रेकॉर्डवरुन. सन २०१३.*